# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 18/03/2023 (शनिवार) सायंकाळ

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. वेलतूर :– फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतूर येथे अप. क्र. २३२/२०२० कलम ३७६, ३७६(अ)(ब), ५०६(२) भादंवि सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील आरोपी नामे– **दादाराव गोवर्धन बन्सोड, वय ४० वर्ष रा. वेलतुर** हा फिर्यादीच्या गावातील ओळखीचा इसम होता व फिर्यादीचे घरी आरोपीचे येणे जाणे होते. यातील फिर्यादीचे आंधळे पती व फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी वय ७ वर्ष ही घरी हजर असता यातील आरोपी हा फिर्यादीचे घरी जावुन फिर्यादीचे पिडीत मुलीस १०रू दिले. पिडीता ही संडास करण्यासाठी गेली असता पिडीतेचे मागे जावुन पिडीते सोबत जबरी संभोग केला. पिडीत/मुलगी ओरडली असता आरोपीने पिडीताला मारून टाकण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि किशोर कुमार वैरागडे मपोउपनि शुभांगी तकीत पोस्टे वेलतूर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक १८/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. श्री. आर.पी. पान्डे सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३७६(अ)(ब) भादवि मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/– रू. दंड, दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास तसेच कलम ५०६(२) भादवि मध्ये २ वर्ष साधी कैद व २०००/–रू दंड व दंड न भरल्यास २ महीने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी आशावरी परसोडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोशी /१२७२ अशफाक शेख पोस्टे वेलतुर यांनी मदत केली आहे.

# घरफोडी

**१) पो.स्टे. नरखेड :–** अंतर्गत वार्ड १७ नरखेड येथे दिनांक १७/०३/२०२३ चे १०.०० वा ते १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– अजय भिमरावजी कडबे, वय ३६ वर्षे, रा. वार्ड नं. १७ नरखेड हे बॅक ऑफ इंडीया शाखा नरखेड येथे सकाळी अंदाजे १०.०० वा. डयुटीकरीता गेले तसेच त्यांची पत्नी ही सुध्दा लगेचच घराला कुलुप लावून मुलांसह शाळेमध्ये गेली होती. अंदाजे दुपारी ०२.०० वा सुमारास फिर्यादी हे घरी आले असता त्यांना त्यांच्या घराचा लॉक तोडलेला दिसला. फिर्यादीने घरात जावून पाहणी केली असता बेडरूम मध्ये असलेल्या लाकडी कपाटाचा दरवाजा उघडा दिसला व त्यामधील सामान अस्तव्यस्त खाली पडलेले दिसले तसेच कपाटातील पर्समध्ये ठेवलेल्या सामानाची पाहणी केली तर त्यात ठेवलेले नगदी २८०००/–रू सोन्याचे ०२ मंगळसुत्रे, (साडे तीन तोळे) किमती अंदाजें १,०५,०००/– रू, दीड तोळयाचा सोन्याचा गोप, किंमती अंदाजे ४५,०००/– रू,. १२ ग्रॅम वजनाचे ब्रासलेट किंमती अंदाजे ३६,०००/– रू, ०६ ग्रॅमच्या ०२ अंगठया किंमती अंदाजे १८,०००/– रू नाकातील बेसर (खडे) ३ ग्रॅम वजनी ०६ नग किंमती अंदाजे ९०००/– रू, असा एकुण २,४१,००० /–रूपयाचा मुद्देमाल व तसेच नरखेड मधील फिर्यादीचा मित्र प्रकाश सनेसर यांचे घरातील सोन्याचे पदक असलेले मंगळसुत्र वजनी ०६ ग्रॅम किंमती अंदाजे १८०००/– रू, कानातले कुंडल ०४ ग्रॅम किंमती अंदाजे १२०००/–रू, गळयातले लॉकेट ०३ ग्रॅम कि. ९०००/– रू, असा एकुण १३ ग्रॅम सोन्याचे दागिने व नगदी ३१,०००/– रू चा एकुण ७०,०००/– चा मुद्देमाल असा दोन्ही ठिकाणचा असा एकुण ३,११,०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे व फिर्यादीचे मित्राचे घराचे दाराचे लॉक तोडून आत प्रवेश करून चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि हरिश्चंद्र गावडे, मो.क्र ८४२४०४३१३५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. नरखेड :—** अंतर्गत खैरगाव ता. नरखेड येथे दिनांक १७/०३/२०२३ चे १२.०० वा. ते १३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सुधाकर सुर्यभान कनीरे वय ५५ वर्षे रा खैरगाव ता नरखेड हे गावातील चुलत काका नामे— वासुदेवराव कनीरे यांचेकडे सकाळी १२.०० वा. सुमारास गेले होते. त्यावेळी घरी त्यांची दोन्ही मुले व सुना हजर होते. परंतु फिर्यादी काकांकडे गेल्यानंतर लगेच त्यांचे दोन्ही मुले व सुना यासुध्दा मोवाड व जलालखेडा येथे कामानिमीत्त घराला कुलुप लावून निघून गेले. त्यानंतर अंदाजे ०१.०० वा. सुमारास फिर्यादीने घरी येवून पाहिले असता घराच्या दाराचे कुलुप तुटलेले दिसले घराचे आत जावून बघीतले असता घरातील दोन्ही लोखंडी आलमारी तुटलेल्या अवस्थेत दिसले व त्यातील सामान अस्तव्यस्त दिसले. आलमारी मधील पर्समध्ये ठेवलेले दोन्ही सुनांचे सोन्याचे मंगळसुत्र वजन ०३ तोळे किंमती अंदाजे ६५०००/— रू, कानातील टॉप्स वजन १२ ग्र/म किंमती अंदाजे ३२०००/— रू, नाकातील नथ वजन ०४ ग्रॅम किंमती ८०००/— रू, गळयातील लॉकेट वजन ०१ ग्रॅम किंमती अंदाजे ३०००/— रू, तसेच चांदीच्या पायपटटया दोन जोड वजन ०८ तोळे किमंती अंदाजे ४०००/— रू, लहान मुलाचे पायपटटया चांदीचे ०४ जोड ०८ तोळे किंमती ४०००/— रू, चांदीचे गोप ०४ तोळे किंमत २०००/— रू, नगदी रक्कम ६००००/— रू, असा एकुण १,७८,०००/— रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात ईसमाने दिवसा दुपारी घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरफोडी करूण चोरी केलेला आहे

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील स.पो.नि हरिश्चंद्र गावडे, मो. क्र ८४२४०४३१३५ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. सावनेर :—** अंतर्गत फिर्यादीचे राहते घर वार्ड क्र. ९ मस्के ले आउट सावनेर येथे दि. १७/०३/२०२३ चे १४.३० वा ते १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— श्रीमती संध्या रामराव मोंडे, वय ४० वर्ष रा. वार्ड क्र. ९ मस्के ले आउट सावनेर यांचे घराचे समोरील दाराचे कुलुप खोलुन आत प्रवेश करून घराचे बेडरूम मध्ये असलेले खुल्या लोखंडी कपाटातील लॉकर तोडुन त्यामधील एक जुने सोन्याची मोठी पोत ज्यामध्ये काळे मणी व सोन्याचे ०८ चे ग्रॅम मणी व ०४ ग्रॅम पदक असलेले किंमती अंदाजे १२,४००/— रू, एक जुने सोन्याची लहान डिझाईनची पोत ज्या मध्ये काळे मणी व सोन्याचे १५ चे ग्रॅम मणी किंमती अंदाजे १५,०००/—रू, एक जुनी सोन्याचे बदाम ठप्याची ०४ ग्रॅमची अंगठी किंमती अंदाजे ४०००/— रू, एक जुनी सोन्याचे बदाम ठप्याची ०३ ग्रॅमची अंगठी किंमती ३०००/— रू, व एक जुनी सोन्याचे डिझाईनची ०५ ग्रॅमची अंगठी किंमती ५०००/— रू, एक कानातील जुने सोन्याचे वेल जोड ०४ ग्रॅम किंमती ४०००/— रू, एक जुना सोन्याचा गोप १० ग्रॅमचा व त्या मध्ये ०१ ग्रॅमचे श्रीकृष्णाचे डिझाईनचे गोल लॉकेट किंमती ११,००० रू, एक जुने सोन्याचे कानाती टॉप्स जोड ०२ ग्राम चे किंमती २०००/— रू, असा एकुण ५६,४००/— रू चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि फुलेकर मो.नं. ७५८८५६४३००हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**